# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (शिक्षण विभाग)

क्र. 3204 /शि.वि./2014 दि. 18/09/2014.

प्रति

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– शालेय स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याबाबत.**

**संदर्भ :– मा.शिक्षण सभापती, सौ. चेतना टांक यांचे दि. 11.09.2014 चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. शिक्षण सभापती, म.न.पा., नागपूर यांनी महानगरपालिका अधिनस्त शाळांमध्ये भेटी दिल्या असता शालेय परीसरात कचरा दिसून आला. वर्गखोल्यात व पायरी / परीसरात सर्वत्र खिचडी सांडलेली दिसून आली, यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरते. यावर माश्या बसत असून यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होवू शकतो. तसेच काही शाळांमध्ये टॉयलेटजवळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली दिसून आली. मुख्याध्यापक म्हणून शालेय स्वच्छतेबाबत सर्वस्वी जबाबदारी आपली आहे .शालेय परीसर स्वच्छ निर्मळ व आरोग्यदायी ठेवण्याकरीता खालील सूचनांचे पालन करावे.

1) शालेय स्वच्छतागृहे व पटांगण स्वच्छता सफाई कामगार यांचेमार्फत करण्यात यावी. त्यांचे कार्यावर देखरेख ठेवण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करावी. त्यांच्याबाबत काही तक्रार असल्यास आपल्या झोनचे आरोग्य अधिकारी व सहा. आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.
2) शालेय परीसरात खिचडी खाण्याकरीता विशिष्ट जागा निर्धारीत करून तेथे विद्यार्थ्यांना रांगेत बसवून मध्यान्ह भोजन दयावे. आवश्यक तेवढेच अन्न देवून उष्टे खाली टाकणार नाही यावर लक्ष दयावे.
3) मध्यान्ह भोजनाचा दर्जा उत्कृष्ठ ठेवून विद्यार्थी वाढलेले अन्न पूर्ण खातील याकडे लक्ष दयावे.
4) मध्यान्ह भोजनानंतर शालेय वर्गखोल्या व परीसर महिला बचत गटाचे कर्मचारी व शालेय चपराशी यांच्या मदतीने स्वच्छ करून घ्यावा.
5) शालेय परीसरात कुठेही अन्न व इतर कचरा असू नये.
6) टॉयलेटजवळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्वरीत बदलविण्यात यावी, विद्यार्थ्यांना पिण्याचे शुध्द पाणी मिळेल याकडे लक्ष दयावे. याकरीता नळाचेच पाणी वापरावे.
7) पिण्याचे पाणी साठविण्याच्या टाक्यांची दर आठवडयात स्वच्छता करण्यात यावी.
8) शालेय परीसरात कुठेही पाणी साचू देवू नये. अश्या पाण्यात डासांची निर्मीती होवून विद्यार्थ्यांना डेंगू–मलेरीया, सारखे रोग होवू शकतात.
8) शालेय परीसरात व वर्गखोल्यात स्वच्छ, निर्मळ व आरोग्यदायी वातावरण ठेवण्याचे कटाक्षाने पाळावे.
9) वर्गनिहाय स्वच्छता मंडळ तयार करून त्यांची मदत स्वच्छता कार्यावर देखरेख ठेवण्याकरीता घ्यावी.

उपरोक्त सुचनांचे पालन न केल्यास आपणांस सर्वस्वी जबाबादार धरून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी –**

1. मा. सभापती, शिक्षण समिती, म.न.पा., नागपूर.
2. शाळा निरीक्षक, झोन 1 ते 10, म.न.पा. नागपूर आपण वरीलप्रमाणे शाळेत अमलबजावणी करून शालेय वातावरण स्वच्छ व निर्मळ करावे.

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc